सायं.दैनिक

# बीड किसान

www.beedkisan.in

• संपादक : शेख कामरान •

BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३७ ▪ शनिवार, दि. १८ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १९ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-337 ▪ Saturaday 18 April, 2026 ▪ Postal Date 19 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## वाहनाच्या धडकेत शेतकऱ्याचा जागीच मृत्यू



आष्टी (किसान न्युज): पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतातील माल झाकून ठेवण्यासाठी कड्यावरून ताडपत्री घेऊन गावाकडे निघालेल्या एका शेतकऱ्याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यु झाला. ही घटना शुक्रवारी रात्री कडा-देवळाली रोडवरील डोंगरगण शिवारात घडली.बाबासाहेब जनार्धन शिंदे (वय ५०) रा.दादेगाव असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील दादेगाव येथील बाबासाहेब शिंदे शुक्रवारी सायंकाळी आपली दुचाकी (क्रमांक एमएच ०४, जीव्ही ५३८४) घेऊन कडा येथील बाजारपेठेत आले होते. किराणा आणि शेतीमाल पावसापासून वाचवण्यासाठी ताडपत्री खरेदी करून ते गावी परतत होते. डोंगरगण जवळ पोहोचले असता, समोरून येणाऱ्या एका भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली.धडक इतकी भीषण होती की बाबासाहेब शिंदे यांचा जागीच मृत्यु झाला. घटनेनंतर अज्ञात वाहनचालक वाहनासह फरार झाला. कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. शिंदे यांच्या निधनाने दादेगाव परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे.

# बीडमध्ये एसबीआय बँकेत आठ दिवसांपासून पैसेच नाहीत

## आरबीआयला बँकेचे पंधरा ई-मेल तरी कॅश उपलब्ध होत नाहीत

बीड । किसान न्युज

**मागील १० ते १२ दिवसांपासून शहरातील एसबीआय बँकेत कॅशचा तुटवडा असून, केवळ १० हजार रुपयांवर ग्राहकांची बोळवण केली जात आहे. तर एटीएममध्ये ही खडखडाट असल्याने नागरिकांची तारांबळ उडाली असून परेशान झालेले दिसून येत आहेत. आतापर्यंत मल्टीस्टेटने कॅश नाही म्हणत चुना लावला असल्याने सामान्य खातेदारांच्या पोटात संशयाचा गोळा उठला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तर पूर्ण जिल्ह्यात शहरातील राजुरीवेस भागातील शाखेतून कॅश पुरवली जाते यामुळे जिल्ह्यातील शाखांमध्ये काहीसे असेच चित्र असल्याने खातेदारांमधून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.**

■ शहरातील एसबीआय बँकेत केवळ १० हजार रुपयांवर ग्राहकांची बोळवण केली जात आहे

बीड जिल्ह्याला रिझर्व बँकेच्या नागपूर कार्यालयाकडून कॅश पुरवली जाते. परंतु मागील दहा ते बारा दिवसांपासून कॅशच आलेली नाही. विशेषत सध्या केवळ ५००, २०० आणि १०० रुपयांच्या नोटा आहेत. यात सध्या ५०० आणि २०० च्याच नोटांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तसेच बीड जिल्ह्यातील अनेकांच्या ठेवी बुडवून मल्टीस्टेट बंद पडल्याने नागरिकांचा मोर्चा मोठ्या राष्ट्रीयकृत बँकांकडे वळला असून, कोणत्याही कामासाठी आता नागरिक बँकेतून कॅश काढत आहेत. मात्र मागील १० ते १२ दिवसांपासून कॅशचा तुटवडा असून जर रोख रक्कम हवी असेल तर ती १० हजार पेक्षा जास्त मिळत नाही असे चित्र आहे. तसेच एसबीआयच्या एटीएममध्ये ही खडखडाट असून कोणत्याही एटीएममधून कॅश मिळत नाही. यामुळे बँकेच्या शाखेतूनच रक्कम काढावी लागत आहे. जास्त रक्कम हवी असल्यास आरटीजीएस अथवा इतर ऑनलाईन पर्याय सुवले जात आहेत. मात्र ज्यांचे रोखीचे व्यवहार आहेत ते खोळंबले असल्याने नागरिक परेशान झाले आहेत. मोठ्या बँकेत ही १० ते १२ दिवस कॅश मिळत नसेल तर जनतेने नेमके खाते कुठे उघडावेत आणि कोणावर विश्वास ठेवावा असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कॅशचा तुटवडा निर्माण झाल्याने अनेकांची कामे खोळंबली असल्याने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. याकडे कोणी लक्ष देऊन ही समस्या सोडविणार का? असा प्रश्न विचारला जात आहे.

### कॅश कधी येईल सांगता येत नाही - शाखा व्यवस्थापक

आमच्याकडे मागील १० दिवसांपासून कॅशचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे मोठी रक्कम ग्राहकांना देता येत नाही. याबाबत आम्ही रिझर्व्ह बँकेला अनेक मेल केले आहेत पण उत्तर काही मिळाले नाही. कॅश कधी येईल हे खात्रीशीर सांगू शकत नाही. तरीही सुरळीत होण्यासाठी आणखी १० दिवस लागू शकतील असे राजुरीवेस भागातील एसबीआय बँकेचे शाखा व्यवस्थापक यांनी सांगितले आहे.

# दिंद्रूड, आडस रस्त्यासाठी १८१ कोटी मातीत जातायत तरी आ.प्रकाशदादा, रमेश आडसकरांचे लक्ष जात नाही

## मुख्य कंत्राटदारांने नेमले जिल्ह्यातील दोन सब कंत्राटदार; तिघे मिळून लावत आहेत रस्त्याची वाट





बीड । किसान न्युज

**जवळपास तीन दशकांनंतर दिंद्रूड ते आडस हा रस्ता होत आहे. मात्र यामध्ये चक्क माती टाकून काम सुरू असल्याने हा रस्ता तीन महिने तरी टिकेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याच रस्त्यावर माजलगावचे आ. प्रकाश सोळंके यांचे मोहखेड आणि रमेश आडसकर यांचे आडस हे जन्मगाव येत असल्याने निदान या दोन नेत्यांनी गावाचा रस्ता म्हणून तरी लक्ष घालून रस्ता दर्जेदार करुन घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या रस्त्याचे बार्शी येथील एका कंपनीला कंत्राट मिळालेले आहे पण या मुख्य कंत्राटदाराने बीड जिल्ह्यातीलच दोन सब कंत्राटदार नेमले असून ते काम करीत आहेत. यामुळे तिघांना मलिदा लाटायचा असल्याने रस्त्याची वाट लावली जात असल्याचे दिसून येत आहे.**


हा रस्ता आधी जिल्हा प्रमुख मार्ग होता मात्र काही वर्षांपूर्वी याची दर्जा वाढ करुन नांदेड-दनगर राष्ट्रीय महामार्ग ते लातूर-बार्शी या मार्गाला जोडणारा रस्ता असल्याने राज्य महामार्ग क्रमांक ३६१ म्हणून जाहीर केला. हा राज्य महामार्ग दिंद्रूड, आडस, होळ, बोरी सावरगाव, बनसारोळा, इस्थळ ते बीड जिल्हा हद्द लांबी ७० किमी असा आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर नांदेड, परभणी, परळी, अंबाजोगाई ते सोलापूर, तुळजापूर, पंढरपूर, बार्शी, पुणे या शहरांचे अंतर कमी होणार आहे. यामुळे हा रस्ता या भागातील जनतेसाठी सोयीचा ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात दिंद्रूड ते आडस या ३० किमी रस्त्यासाठी १८१ कोटी निधी मिळाला असून, या निधीतून हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाच्या धर्तीवर प्रशस्त असा होणार आहे. याचे टेंडर होऊन बार्शी येथील एका मोठ्या कंपनीला याचे कंत्राट सुटले आहे. सध्या काम सुरू आहे. पण मुख्य कंत्राटदारांने बीड जिल्ह्यातीलच दोन सब कंत्राटदार नेमले असून ते या रस्त्याचे काम करत आहेत. तब्बल तीस वर्षांनंतर रस्त्याचे काम होत असल्याने या भागातील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. पण कंत्राटदार मुरुम टाकून दबाई करण्याऐवजी चक्क » पान २ वर

# गॅस एजन्सी समोर 'नो स्टॉक' चे फलक; गॅसचा तुटवडा नाही म्हणणारे तोंडघशी पडले

## घरगुती सिलेंडरचा तुटवडा बीडकर हैराण; सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याची शंका

बीड । किसान न्युज

घरगुती गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील गॅस एजन्सी समोर 'नो स्टॉक'चे फलक लावल्याने ग्राहकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असून संतापाची लाट उसळली आहे. बीडकर हैराण दिसत आहेत. तसेच सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याची शंका नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. तसेच सत्ताधारी पक्ष आणि पदाधिकारी घरगुती वापराच्या गॅसचा तुटवडा नाही असा दावा करीत होते मात्र 'नो स्टॉक' च्या फलकांमुळे ते तोंडघशी पडल्याचे दिसून येत आहेत. मागील महिनाभरापासून गॅस सिलेंडर मिळण्यात सातत्याने अडथळे येत आहेत. नागरिकांना गॅस मिळवण्यासाठी आधी बुकिंग करावे लागत असून, ओटीपी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच सिलेंडर दिला जात असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, अनेकदा ओटीपी मिळूनही प्रत्यक्षात सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. घरगुती गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिक सकाळपासूनच गॅस एजन्सी बाहेर रांगा लावत आहेत सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय, गॅस बुकिंगसाठी दिलेले काही संपर्क » पान २ वर






# बीडमध्ये उद्या सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीड । किसान न्युज

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त उद्या दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य





महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमांतून नागरिकांना सामाजिक प्रबोधन » पान २ वर

# बीड महसूल विभागाची वाळू वाहतूकीवर धडक कारवाई

बीड । किसान न्युज

बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या वाळू घाटांच्या लिलावाच्या पार्श्वभूमीवर चोरट्या पद्धतीने सुरू असलेल्या वाळू उपसा व वाहतुकीवर महसूल विभागाने मोठी कारवाई करत अवैध धंद्यावर जोरदार लगाम लावला आहे. मांजरसुभा-पाटोदा मार्गावरील खंडाळा परिसरात रात्री उशिरा टाकलेल्या सापळ्यात दोन टिप्पर जप्त करण्यात आले असून सुमारे ८० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. विनापरवाना विना रॉयल्टी वाळू वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळताच नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी तातडीने कारवाई करत संशयास्पद टिप्पर अडवले. तपासणीदरम्यान




आवश्यक रॉयल्टी पावत्या नसल्याचे स्पष्ट झाल्याने दोन्ही वाहने ताब्यात घेण्यात आली. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या वाहन चालक१) अप्पासाहेब राजेंद्र चव्हाण (रा. आनंदवाडी, ता. गेवराई, जि. बीड)२) राजेंद्र बाबुराव जाधव (रा. जाधव वस्ती, मोरगाव, ता. बीड, जि. बीड) » पान २ वर

# युवा सेना उपजिल्हाप्रमुख संतोष चौधरी यांच्या गाडीला शिक्रापूर जवळ अपघात!

बीड । किसान न्युज

परळी वैजनाथ येथील युवा सेना उपजिल्हा प्रमुख संतोष चौधरी हे काल मध्यरात्री बीड येथून मुंबई कडे येत असताना शिक्रापूर येथे त्यांच्या गाडीला अपघात झाला, या अपघातामध्ये संतोष चौधरी यांच्या गाडीचे मात्र प्रचंड नुकसान झाले आहे, सुदैवाने यामध्ये कोणताही जीवित हानी झाली नसून संतोष चौधरी यामध्ये बाल बाल बचावले आहे. घटनेची माहिती कळताच युवासेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक, युवासेना सचिव किरणजी साळी, युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय सचिव विपुल पिंगळे यांनी दूरध्वनी वरून संतोष चौधरी तथा युवा सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची विचारपूस केली मध्यरात्री परळी येथून युवासेनेच्या मुंबई येथील मेळावा साठी उपस्थित राहण्यासाठी मुबई कडे निघाले होते.

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

✆ 9850643058

सोने २४ कॅरेट 153,500

२२ कॅरेट 147,000

चांदी प्रतिकिलो 252,000

# बहुचर्चित विजय काळे खून प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर : ॲड.शशिकांत सावंत

बीड । किसान न्युज

दि.१८ : बीड शहरातील बहुचर्चित खून प्रकरणात आरोपी अभिषेक गायकवाड याला न्यायालयाने जामीन मंजूर केला असल्याची माहिती बचाव पक्षाचे वकील ॲड.शशिकांत सावंत यांनी दिली. २ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास आरोपी अभिषेक राम गायकवाड याने मयत विजय सुनील काळे याच्यावर छाती व पोटावर धारदार शस्त्राने वार करून



त्याचा खून केल्याची घटना घडली होती. ही घटना मयताच्या मित्रासमोर घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. या घटनेप्रकरणी मयताचे वडील सुनील मारुती काळे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्यानंतर गुन्हा र.नं.४५२/२०२५ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०२ तसेच भारतीय न्याय संहिता कलम १०३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीस अटक करून सखोल तपास केला. तसेच घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले होते. या फुटेजमध्ये आरोपीच्या हातात धारदार शस्त्र असल्याचे दृश्य आढळून आले होते. याशिवाय, या प्रकरणात चार प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून, त्याआधारे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सदर प्रकरणाचा सत्र प्रकरण क्रमांक १७०/२०२५ असा आहे. दरम्यान, सुनावणीदरम्यान » पान २ वर

# ट्रॅक्टर चोरीचा एलसीबीने दोन दिवसात लावला छडा

बीड । किसान न्युज

**केज तालुक्यातील कानडी माळी येथून चोरीस गेलेल्या ट्रॅक्टर व ट्रॉली प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दोन दिवसांत उलगडा केला आहे. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून सुमारे ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**





मिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिल २०२६ रोजी फिर्यादी सतीश सुदाम बनसोडे राहणार कानडी माळी तालुका केज यांनी त्यांच्या ट्रॅक्टर व ट्रॉलीची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची तक्रार दिली होती. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१२/२०२६ कलम ३०३(२) बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ सक्रिय झाले. तपासादरम्यान विविध व चोरीस गेलेल्या ठिकाणापासून ४० पेक्षा जास्त सीसीटिव्ही चे फुटेज तपासण्यात आले शोधमोहीम राबवून तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित आरोपीचा माग काढण्यात आला. १७ एप्रिल रोजी पाटोदा तालुक्यातील पाय तळवाडी तालुका माजलगाव येथून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून चोरीस गेलेला ट्रॅक्टर व ट्रॉली » पान २ वर